'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 85 (A) : Sardar Vallabhbhai Patel & National Integrity
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

# सरदार वल्लभभाई पटेल यांचे सामाजिक व राजकीय विचार

डॉ. पी.बी. सिरसट
वसंतदादा पाटील महाविद्यालय पाटोदा जि. बीड
मो.नं. ९६६५७९५९३६.
sirsatpandit1968@gmail.com

**प्रस्तावना:**

स्वातंत्र भारताला सरदारांच्या नेतृत्वांचा लाभ झाला हे सुदैव आहे. त्यामुळे एका पिढीचे भवितव्य घडले. परंतु दुदैव असे की, ते गेल्यावर त्यांचा जागा भरून काढावयास कोणीही येणार नाही.

''आज सरदार वल्लभभाई पटेल हयात असते तर भारताची ही दयनीय स्थिती झाली नसती. कारण अनेक विचारवंतांनी भारतीय एकात्मतेबद्दल सकारात्मक अशा ठेवल्या होत्या. परंतु आज सर्वत्र फुटीर शक्ती, भाषावाद, प्रांतकार विघटनास कारणीभूत ठरत आहे. देशा समोर अनेक समस्या व आव्हानांनी तांडव केलेले दिसते. अशावेळी पोलादी पुरूष सरदार वल्लभभाई पटेलची यांची आठवण येते.''

वल्लभभाई पटेल हे भारतीय राजकीय व सामाजिक नेते होते. त्यांनी देशाच्या स्वातंत्र्य भारताच्या राजकीय एकसंघी करणार मोठे योगदान दिले. त्यांनी भारतीय महिलांनी 'सरदार' हया पदवीने संबोधित केले होते. वल्लभभाई पटेल पेशाने वकील होते.

वल्लभभाई पटेल यांचा जन्म ३१ ऑक्टोबर १८७५ मृत्यु १५ डिसेंबर १९५० ला झाला. सरदार पटेल हे लोकप्रिय भारतीय राजकारणी व भारताचे पहिले उपमाहद्वीप म्हणून काम केले. ते इंडियन नॅशनल कॉंग्रेसचे ते वरिष्ट नेते व भारतीय प्रजासत्ताकाचे महत्वाचे संस्थापक व भारतीय बॅरिस्टर तसेच स्वातंत्र्यासाठी देशाच्या लढयात महत्वाची भूमिका बजावली. व एकत्रित आणि स्वातंत्र्य राष्ट्रामध्ये एकीकरण केले. त्यांनी भारतासाठी महत्वपूर्ण काम केले. राजकीय युद्धाच्या कामात भारतीय सैन्यात वास्तविक कमांडर–इन–चीफ म्हणून काम केले.

भारतीय स्वातंत्र्य लढयात आणि भारताला स्वातंत्र्य मिळाल्या नंतरही त्यांना महत्त्वाचे असे स्थान आहे. कारण एक कॉंग्रेसला एकत्र करण्यासाठी महत्त्वाची भूमिका निभावली आहे. म्हणून त्यांना पोलादी पुरूष म्हणून ओळखले जाते. ते स्वतःला शेतकरी, भारतीय एक सच्चा सैनिक मानत असत. सैनिकात व शेतकऱ्यात स्वाभीमान व नव चैतन्य निर्माण करीत असत. साधी रहाणी उच्च विचार सरणी आणि ताबडतोब कृतीवर त्यांचा भर होता. देशाच्या फाळणी मागील द्विराष्ट्रवाद त्यांना अमान्य होता.

**उद्देश :**

१. भारतीय राजकीय स्थर्य आबाधीत ठेवणे.
२. भारतीय सामाजिक स्थर्य साबीत ठेवणे.
३. संस्थानाचे एकीकरण विलीनीकरण, लोकशाहीकरण आधुनिकीकरण करणे.
४. भारताला भाषीक, समाजिक, सांस्कृतीक, भौगोलिक एक संघ बनवणे.
५. अन्याय विरोधी आवाज, व्यासनाधीनता जाती भेद, महिला वरील अन्यायाच्या विरोध लढा देणे.

वल्लभभाई पटेल यांचा राजकारणात प्रवेश झाला. पटेल शालेय जीवना पासून राजकारणात व मुलांचे पुढारी व नेता होते. कोणतीही घटना घडत असताना पटेल सत्याची बाजूच पाहत होते कोणवरही अन्याय होता

कामा नये. या प्रवृत्तीमुळे वल्लभभाईने राजकारणात सक्रीय सहभाग घ्यावा असे भारतीय तरूणांना वाटत होते. कारण तरूणांचा बुद्धीमान नेता हवा होता. भारतीय राजकारणात ते महवाची भूमिका पार पाडू शकतात. यांची शासवती भारतीय तरूणाला होती. तेव्हा अति महत्वाच्या जागा हया इंग्रजांच्या हाती होत्या. त्यामुळे कोणताही निर्णय किंवा कायदा त्यांच्या मर्जीनुसार तयार करण्यात येत असे. तेंव्हा भारतीय राजकारणात प्रवेश केल्यावर पटेलांनी इंग्रज अधिकाऱ्यांची अरेरावी चालु दिली नाही. ते स्वत:च बॅरिस्टर असल्याने कायद्याच्या आधारे त्यांच्या हुकूमशाहीला पटेलांनी लगाम घातला होता आणि अनेक भारतीयांना न्याय मिळवून दिला होता.

सरदार पटेलांना मंत्रिमंडळात घेतल्यावर नेहरू त्यांना पत्रात म्हणतात. ''तुम्हाला मी केवळ औपचारिकता म्हणून हे पत्र पाठीत आहे. खरं तर माझ्या मंत्रिमंडळाच्या तुम्हीच सर्वात भक्कम आधार आहात.'' या पत्राला उत्तर देताना पटेल म्हणतात. ''गेल्या ३० वर्षातील आपली मैत्री आणि आपण एकत्रिपणे केलेले कार्य पाहता आपल्या कसलीही औपचारिकता असूच शकत नाही. तुम्ही देशासाठी एवढा त्याग केला की, तुमच्या वरील माझे प्रेम आणि निष्ठा अखेर पर्यन्त कायम राहील. तुमच्यासाठी मी कायम उपलबध आहे. आपलं ऐक्य अभंग राहील आणि तीच सर्वात मौठी शक्ती आहे.

पंडित नेहरूच्या दृष्टीने भारताच्या एकात्मतेचे पहिले आणि सार्वात महत्वाचे शिल्पकार पोलादी निर्धाराने, घणाचे घाव घालुन त्यांनी देश उभा केला. त्यामुळं त्यांची नोंद इतिहासात झाली. आपल्या स्वातंत्र्य लढयाचे ते थोर सेनानी म्हणून आपल्या स्मरणात राहतील. सरदार म्हणजे विजयाच्या आणि पराभवाच्या क्षणी आपला योग्य सल्ला देणारा आणि ज्याच्यावर नि:शंकपणे विश्वास ठेवावा असा नेता होता. जेव्हा देश संकटात होता त्यांनी मार्ग दाखवला.

माउंटबेटन म्हणतात ''सरदार पटेल यांचे व्यक्तिमहत्व एक विरोधाभास म्हणून माझ्या लक्षात राहील. पोलादी इच्छाशक्तीचा माणूस, सच्चा दुरदृष्टी आणि कठोर प्रशासक असे ते वरकरणी वाटत. परंतु अंत:करणानं मृदू, सभ्य आणि भावनाशील होते. ज्यांना त्यांनी आपले मित्र म्हटले त्यांच्याशी एकनिष्ठ राहून देशाची सेवा किती सचोटीने करता येते हे. सरदार पटेल इतकं कोणाला जमेल असे मला वाटत नाही.''

तसंच पुढं माउंटबॅटन म्हणतात की, भारताचे एकीकरण झालं नसते तर भारताच्या स्वातंत्र्याला फार मोठया प्रमाणात धोका निर्माण झाला असता. तर ही फार मोठी सर्वोच्च कामगिरी होय. या प्रमाणे भारतीय इतिहास कारणांनीच नाही तर इंग्रज अधिकाऱ्यांनी पण पटेलाची स्तुती केली आहे.

शेतकऱ्याचे कैवारी १९२६ ला इंग्रजांनी बर्डोलाच्या शेतकऱ्याचा शेतसारा ३० टक्क्याने वाढवला होता. शेतकरी अगोदर दुष्काळानी बेजार होता. ऐवढा शेतसारा भरणे शक्य नव्हते. गांधीने पटेलांना सांगितले की तुम्ही शेतकऱ्यांसाठी आंदोलन करा. तेंव्हा वल्लभभाई आपण पहिला सत्याग्रह बार्डोलीच्या शेतकऱ्यासाठी आंदोलन करा. तेव्हा वल्लभभाई आपण पहिला सत्यागृह बार्डोलीच्या शेतकऱ्यांसाठी केला. इंग्रज शेतकऱ्याचा मोठया प्रमाणात छळ करीत होते. तरीही शेतकऱ्यांना पटेलांनी सांगितले की कोणी रणांगण सोडून जाऊ नका. आंदोलन चालू ठेवा. पटेल यांच्या सत्यागृहात सामिल होण्यासाठी गुजरात मधील ६९ पोलिस पाटील, अनेक तलाठी, अनेक आमदारांनी राजीनामे दिले. त्यामुळे सरकार चिडले आणि शेतकऱ्यांच्या गायी, म्हशी जप्त करू लागले. पण जी जनावर जप्त केली त्यांच्या चारा पाण्याची सोय इंग्रज सरकारने केली नाही. यावेळी वल्लभभाईने आपल्या भाषणातून लोहाराची गोष्ट सांगितली की, लोखंडाला वाकवण्यासाठी लोखंड तापवावे लागते. मात्र लोखंडावर हाणावयाचा घन हा थंडच असावा लागलो. इंग्रज सरकार फार तापलेले आहे आपण शांत व थंड रहा.

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 85 (A) : Sardar Vallabhbhai Patel & National Integrity
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

सरकार आपोआपच वटणीवर येईल. तेव्हा शेतकऱ्यांच्या विजय झाला. सत्याग्रहाचे नेतृत्व पटेलांनी केले; शेतकऱ्यांचा विजय झाला. सत्यग्रहाचे नेतृत्व पटेलांनी केले; शेतकऱ्यांनी पटेलांना 'सरदार' ही पदवी बहाल केली. गांधीने हीच सरदार पदवी देवून त्यांचा सत्कार करण्यात आला. यापुढे ते सरदार वल्लभभाई पटेल या नावाने ओळखले जावू लागले. लोहपूरूषा सरदार वल्लभभाई पटेलांबद्दल महत्वाच्या ८ गोष्टी.

१. पटेलांनी गुजरातमधील गोध्रा, बोरसाड आणि आनंद येथे कायद्याचा अभ्यास केला.
२. बॅरिस्टरसाठी पटेलांनी इंग्लंड गाठले आणि ३६ महिन्यांचा अभ्यासक्रम ३० महिन्यांत पूर्ण केला.
३. गांधी व पटेलांची भेट गोध्रा येथे भेट झाली त्यानंतर गांधीचा प्रभाव पटेलावर पडला. त्यानंतर कॉंग्रेस पक्षात दाखल झाले. इथून पुढे राजकारणी बनले.
४. पटेलांनी नोकरी सोडली व खेडयामधील कर मुक्तीच्या आंदोलनात सामिल झाले.
५. असहकार चळवळीत आल्यावर पटेलांनी पश्चिम भारताचा दौरा कोण व ३००० हजार सदस्य चळवळीत सामील करून घेतले.
६. पटेलांनी अन्याय विरोधी आवाज उठविला. व्यसनाधीनता, अस्पृश्यता, जातीभेद व महिलांवरील अत्याचार विरोधता आवाज उठविला.
७. ब्रिटीशांनी भारतीय तिरंगा फडकावण्यावर बंदी घातली होती. तेव्हा १९२३ ला पटेलांनी नागपूरला सत्यागृह केला होता.
८. स्वतंत्र्य भारताचे पहिले गृहमंत्री व भारताचे उपपंतप्रधान म्हणून अतिशय महत्त्वाची जबाबदारी पार पाडली.

संस्थानांचे विलिनीकरण व पटेलांची भूमिका फार महत्वाची होती. भारताला स्वातंत्र्य इंग्रजांनी दिले व ते देश सोडून गेले. परंतु जातांना अशी मोठी दरी निर्माण करूण गेले की, हिन्दू व मुस्लीम यांच्यात द्वेश निर्माण करूण गेले. देशत अनेक संस्थाने होती. इंग्रजांनी त्यांना राज्य करण्याचा अधिकार दिला होता. त्यामुळे संस्थानिकांचा अन्याय वाढला होता. भारत स्वातंत्र्य झाला होता. गृहमंत्री पटेलांनी सर्वांना आदेश दिला होता की आपण भारतात विलीन व्हावा कोणी सामील जर नाही झाले तर कोणतीच मदत देता येणार नाही.

शवेटी भारतीय सर्व संस्था भारतामध्ये सामील झाले. परंतु हैद्राबाद संस्थान आणखी सामील व्हायला तयार नव्हते. तेव्हा हैद्राबाद मध्ये पोलीस ॲक्शन घेऊन हैद्राबाद हे भारतात सामील करून घेतले.

वल्लभभाई पटेलांनी खूप अभिमानाने संस्थानिकांना सांगितले, तुमच्या पैकी बरेचजण व माझे जवळचे मित्र आहेत. याचा मला खूप आनंद आहे. पटेलांनी संस्थानिकांना सांगितले होते की, पुर्वीच्या काळी आपसातील मतभेद, इर्ष्या आणि ऐकमेकांमधील भांडणामुळे आपल्यात फुट पडली त्यामुळे परकीय शासकांनी आपल्यावर अधिकार गाजवला. तेंव्हा आता वेळ आली आहे. पुन्हा त्यांच्या तवडीत सापडयांची चुक करू नका. कारण भारत स्वातंत्र्यांच्या उंबरठयावर आहे. तेव्हा राज्यांच्या तशाच वेगवेगळया भागात एकजूटीची आणि परस्पर सहकार्याची आवश्यकता आहे.

बहुसंख्यांक आपली जबाबदारी ओळखत नसतील, तर हे देशाचे दुर्भाग्य असेल, जर मी अल्पसंख्यांक समुदयाचा असतो तर हे विसरून गेलो असतो की मी अल्पसंख्यांक आहे. हे त्यांचे प्रसिद्ध वाक्य आहे. देशाची एकता आणि स्वातंत्र्याचे रक्षण त्यांचे जीवनाचे लक्ष्य होते. नाविकांच्या विद्रोहाला देखिल त्यांनीच इशारा देऊन शांत केले. घटनासभेत देखील देशाची एकता भंग पावू नये याची दक्षता त्यांनी घेतली. देशाच्या

एकतेसाठीच हिंदीला राष्ट्र भाषेचा दर्जा देण्यात आला. या बरोबर सोमनाथ मंदिराच्या जीर्णोद्धार करून लयास गेलेले वैभव पुन्हा मिळवून देण्याचे कार्य सरदार पअैलांनी केले.

**सारांश :**

१. ''भारताच्या राजकीय एकसंघीकरणात मोठे योगदान दिले.''

२. ''सरदार वल्लभभाई पटेल या खंबीर व्यक्तिमत्वाच्या कणखर नेतृत्वाची नोंद इतिहासाने घेतली.''

३. पटेलांनी कौशलयाने व मुत्सद्देगिरीने विलिनीकरणाची प्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडली व संस्थानाचे विलिनीकरण करून अखंड भारताच्या निर्मितीत मोलाची कामगिरी बजावली.

**संदर्भ सुची :**

१. सरदार वल्लभभाई पटेल प्रा.डॉ. वानखेडे यु.डी/प्रा.डॉ. आचार्य आर.डी.
२. सरदार वल्लभभाई पटेल – वि.र. काळे
३. लोहपुरूष – सरदार वल्लभभाई पटेल – विलास गिते
४. मराठवाडयाचा इतिहास – प्रा.एस.एस. भांडवलकर / प्रा. यु.एस. हनवते.
५. संस्थान हैद्राबादचे – द.ग. देशपांडे
६. पोलादी पुरूष सरदार वल्लभभाई पटेल – हेमराज शाह